सर ज.जी कला महाविद्यालय, सर ज.जी उपयोजित कला महाविद्यालय, व सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयांच्या विकासाकरिता पुरक मागणीव्दारे मंजूर झालेला निधी वितरित करण्यास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र : पुरक २०१९/प्र.क्र.६२/तांशि ६

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३० ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ :-</u>

१. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं २०१९/प्र क्र ९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं २०१९/प्र क्र ९३/अर्थ-३, दिनांक ९ जुलै, २०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

कला संचालनालयाकडून सर ज.जी.कला महाविद्यालय, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, व सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयांच्या विकासासंदर्भात सन २०१९-२०, २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या तीन वर्षांकरिता सविस्तर आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखडयामध्ये शैक्षणिक विकास, पायाभूत सुविधा, ऐतिहासिक वारसा व लोकाभिमुखता वाढविणे या बाबींचा समावेश आहे. त्यानुसार सर ज.जी.कला महाविद्यालय, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, व सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयांच्या इमारतींचा जिर्णोद्धार आराखडा बनविण्यासाठी तज्ञ वास्तुशास्त्रज्ञांची नियुक्ती करणे आणि अनुषंगिक बाबींसाठी जून २०१९च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये ५ कोटी इतके पुरवणी अनूदान मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी ६०टक्के म्हणजेच रू ३ कोटी इतका निधी वितरित करण्यास मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर निधी वितरित करण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :-

सर ज.जी.कला महाविद्यालय, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, व सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयांच्या इमारतींचा जिर्णोद्धार आराखडा बनविण्यासाठी तज्ञ वास्तुशास्त्रज्ञांची नियुक्ती आणि इतर अनुषंगिक बाबींसाठी सन २०१९च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मंजूर झालेल्या रू ५.०० कोटी इतक्या पुरवणी अनुदानाच्या ६०% म्हणजेच ३ कोटी इतका निधी वितरित करण्यास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. हा निधी संचालक, कला संचालनालय, मुंबई यांना बीडीएसप्रणालीव्दारे उपलब्ध करून देण्यात यावा.

२ यासाठी होणारा खर्च, मागणी क्र डब्लू-४, २२०५ कला व संस्कृती, १०१-ललित कला शिक्षण (०१)कला संचालनालय, (०१)(०१) कला संचालनालय अनिवार्य, (२२०५००१९), १३ कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व तो सन २०१९-२०च्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र ५२२/१९/व्यय ५, दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०८३०१६२६३९३४०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sandesh Rajaram Utekar

Digitally signed by Sandesh Rajaram Utekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=009789e9fe23fde06096381e43bebecd32b5c692c899745eee7d89d805005a87, cn=Sandesh Rajaram Utekar
Date: 2019.08.30 16:37:53 +05'30'

(सं रा. उतेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी , महाराष्ट्र , मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई
४. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई.
५. कक्ष अधिकारी वित्त विभाग (व्यय५/ अर्थ-८) मंत्रालय , मुंबई
६. कार्यासन अधिकारी साशि१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवडनस्ती तांशि ६.